गीत-२

चाल-:- स्वतंत्र



सार्‍या जगाला,तूच बनवलं
सांगतो सार्‍या या जगा
गुरुवरा,वंदन माय तुले

!!१!! बनवलं तू हे सर्वअभाय
चंद्र न चांदणे बनवलं हाय
सूर्याचा तूं उजीळदिला
कस इसरू रे मी तुले सार्‍या

!!२!! सार्‍या जगाचा तू कैवारी
तुले हाक मारते बापा म्हणुनी
तुया विना जाऊ कुठ मी
सांग प्रभू मले

!!३!! मी बापा आलो पायाशी
रमून गेलो तुया भजनी
सुखात तू माया दुखात तू
मले संकटात तारणारा

!!४!! सेवा करीन मी तुले वाढविण
बुद्धी आमाले दे तुये गुण गाईन
कबुल कर मले हे प्रभुराया
प्रार्थना हि तुले

